महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.१२३/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ७ सप्टेंबर, २०१६

प्रस्तावना –

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन शाळा स्थापन करण्यास अथवा विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर झाले आहेत. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सोबतच्या सहपत्रामधील १७ शाळा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे .

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) सदर शासन निर्णयाच्या सोबतच्या सहपत्रामधील संबधित शाळांच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

Scanned by CamScanner

कनिष्ठ लिपीक
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१

AnyScanner

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सीबीएसई मंडळाशी संलग्नतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात

Scanned by CamScanner

SCAN AnyScanner

येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(स्वाक्षरी)

(रा. ग. गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/कोल्हापूर/लातूर.
६. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद (प्राथमिक/माध्यमिक), ठाणे/पालघर/नाशिक/पुणे /अहमदनगर/सोलापूर/औरंगाबाद/सिंधुदुर्ग/नांदेड
७. निवडनस्ती (एसएम-२)

Scanned by CamScanner

AnyScanner

स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन), अधिनियम,२०१२ अंतर्गत कलम ७(१) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यागान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावांची यादी

शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-१०१६/प्र.क्र.१२३/एसएम-२, दिनांक ७ सप्टेंबर,२०१६ चे सहपत्र

| अ.क्रं | जिल्हा | संस्थेचे नाव व पता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | ठाणे | तेलुगु समाज शिक्षण संस्था १६८,कणेरी,भिवंडी. | विकास इंग्लिश मेडियम हायस्कुल १८५ ( कामतघर ) पद्मानगर भिवंडी | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| २ | ठाणे | मुंब्रा शिक्षण प्रसारक मंडळ मुंब्राद्वारा, जी आर पाटील महाविद्यालय पोलीस स्टेशन च्या मागे, मुंब्रा जिल्हा ठाणे (महाराष्ट्र) पिन न ४००६१२ | जी आर पाटील कला विज्ञान व वाणिज्य कनिष्ट महाविद्यालय बुरसुंगे तालुका मुरबाड जिल्हा ठाणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ३ | ठाणे | मुंब्रा शिक्षण प्रसारक मंडळ मुंब्रा द्वारा, जी आर पाटील महाविद्यालय पोलीस स्टेशन च्या मागे, मुंब्रा जिल्हा ठाणे (महाराष्ट्र) पिन न ४००६१२ | जी आर पाटील विज्ञान व वाणिज्य कनिष्ट महाविद्यालय अंबरनाथ बी-कॅबीन रोड, ग्रीन सिटी समोर, अंबरनाथ (पूर्व) तालुका अंबरनाथ जिल्हा ठाणे महाराष्ट्र | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक वाणिज्य-विज्ञान (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ४ | ठाणे | साक्रेड हार्ट स्कूल ट्रस्ट सेक्टर ४, वाशी , नवी मुंबई, 400703 | सेक्रेड हार्ट जूनिअर कॉलेज सेक्टर ४, वाशी, नवी मुंबई , ४००७०३ | दर्जावाढ | राज्य मंडळ | माध्यमिक ला जोडून उच्च माध्यमिक कला-वाणिज्य (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | इंग्रजी |
| ५ | ठाणे | विद्या विकास मंडळ वासिंद मु.पो.वासिंद तालुका शहापूर जिल्हा ठाणे | शारदा इंग्लिश मिडीअम स्कूल वासिंद मुक्काम -पोस्ट :- वासिंद, तालुका :- शहापूर, जिल्हा :- ठाणे. पिनकोड ४२१६०१ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |
| ६ | पालघर | कै अनंत के पाटील एज्युकेशन ट्रस्ट नायगाव , नालासोपारा वेस्ट ता.. वसई जि: पालघर | कै अनंत के पाटील एज्युकेशन ट्रस्ट प्रायमरी इंग्लिश मेडिंअम स्कूल निलेगाव , नालासोपारा (वेस्ट ), ता. वसई , जि पालघर -४०१२०३ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ५ वी.) | इंग्रजी |
| ७ | नाशिक | के टी एस हिरे शिक्षण संस्था वीर सावरकर नगर दाभाडी त मालेगाव जी नाशिक | जयहिंद इंग्लिश मिडीयम स्कूल वीर सावरकर नगर, दाभाडी ता. मालेगाव जि नाशिक | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | इंग्रजी |
| ८ | पुणे | चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळभोई आळी चिंचवड पुणे ४११०३३ | न्यू इंग्लिश स्कूल, बिजलीनगर चिंचवड पुणे ४११०३३ | दर्जावाढ | राज्य मंडळ | प्राथमिक ला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी. ते ८ वी.) | इंग्रजी |
| ९ | पुणे | परिवर्तन शिक्षण संस्था, नो ५३ हिस्सा नो १/ब ओप्पोसित म्हसोबा मंदिर काळे पडल हडपसर पुणे ४११०२८ | एस आर विक्टरी स्कूल३५/८ ,कालेपदल, हडपसर , पुणे | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |
| १० | अहमदनगर | ओम शांती धाम सेवा संस्था बी - १२ , आगरकर - नेहरू क्रॉस रोड डोंबिवली -(पूर्व ) तालुका - कल्याण जिल्हा - ठाणे | मनकर्णिका गोरख पाटील प्राथमिक इंग्रजी माध्यम शाळा गाव - निघोज ता. राहता जिल्हा.अहमदनगर | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ५ वी.) | इंग्रजी |
| ११ | सोलापूर | रवींद्र श्रीपाद कुलकर्णी मदत निधी४३/१६ अ "गुणाधार" कर्वे रोड , नळ स्टॉप, एरंडवणा,. पुणे - ४११००४ | जोगेश्वरी इंग्लिश प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा,मुकाम पोस्ट शेज बाभूळगाव , राम मंदिर आणी आयुर्वेदिक दवाखान्या जवळ, कुरुल - अंकोली रस्ता , तालुका मोहोळ , जी .- सोलापूर ४१३२५३ | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते उच्च माध्यमिक सर्व शाखा (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| १२ | सोलापूर | ऋषितुल्य शिक्षण प्रसारक मंडळमुकाम पोस्ट चिक महूद तालुका सांगोला जिल्हा सोलापूर | कर्मवीर भाऊराव पाटील जुनिओर कॉलेजमुकाम चिक महूद तालुका सांगोला जिल्हा सोलापूर | नवीन शाळा | राज्य मंडळ | उच्च माध्यमिक कला-विज्ञान (इयत्ता ११ वी. ते १२ वी.) | मराठी |

Scanned by CamScanner

SCAN AnyScanner

शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-१०१६/प्र.क्र.१२३/एसएम-२, दिनांक ७ सप्टेंबर,२०१६ चे सहपत्र

| अ.क्रं | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १३ | औरंगाबाद | ओम शिक्षण प्रसारक मंडळ बीड चाणक्यपुरी बीड ता. जि. बीड ४३११२२ | हिमालया पब्लिक स्कूल औरंगाबाद अर्जुन नगर, बीड बायपास, देवळाई परिसर औरंगाबाद | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक विज्ञान (इयत्ता १ ली. ते १२ वी.) | इंग्रजी |
| १४ | सिंधुदुर्ग | गुरुवर्य बी एस नाईक मेमोरिअल ट्रस्ट सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग | इंग्लिश मिडीयम स्कूल तळवडे कुभारपुरा मु. पो. तळवडे ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग 416510 | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली. ते १० वी.) | इंग्रजी |
| १५ | सिंधुदुर्ग | नेरूर समृद्धी प्रतिष्ठान मुंबई ब/४ अंबा अपार्टमेंट, पहिला मजला ,शिवाजी पार्क, रोड नंबर ५ , माहीम मुंबई. | आयडियल इंग्लिश मिडीअम स्कूल, साईगाव, ता. कुडाळ जि. सिंधुदुर्ग | नवीन शाळा | राज्य मंडळ | प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ५ वी.) | इंग्रजी |
| १६ | सिंधुदुर्ग | डॉ शिरोडकर एज्युकेशन सोसायटी मुंबई १४२/४९, डॉ बोर्जेस रोड परेल मुंबई ४०००१२ | खुडी माध्यमिक विद्यालय खुडी मु.पो.खुडी ता.देवगड जि.सिंधुदुर्ग पिन 416611 | नवीन शाळा | राज्य मंडळ | माध्यमिक (इयत्ता ९ वी. ते १० वी.) | मराठी |
| १७ | नांदेड | संगमेश्वर देवस्थान चारीटेबल फाउंडेशन प्लाट नं ७२ अशोक नगर , भाग्यनगर रोड , नांदेड -431605 | माउंट झी लीटेरा स्कूल सुर्वे नं.22/E,म्हल्जा ,नांदेड | नवीन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च प्राथमिक (इयत्ता १ ली. ते ८ वी.) | इंग्रजी |

Scanned by CamScanner

SCAN AnyScanner